## महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

मुख्य कार्यालय : ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१
क्षेत्रिय कार्यालय : मीईटी सेल, शासकीय दंत महाविद्यालया समोर, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
: मीईटी सेल, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१
ई-मेल - maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट :www.mahacet.org


क्र.राज्य सीईटी कक्ष/नीट युजी २०१७/नोटीस क्र. १/परीक्षा/पध्दती/६६५/२०१६ दिनांक: ०६/१२/२०१६

### नोटीस

**शैक्षणिक वर्ष २०१७ -१८ पासून आरोग्य विज्ञान व्यावसायिक पदवी पुर्व अभ्यासक्रमाचे प्रवेश NEET(National Eligibility-cum-Entrance Test)या सामाईक प्रवेश परीक्षेमार्फत करण्याबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक सीईटी ३५१६/प्र.क्र.४४१/१६/ शिक्षण-२, दिनांक ०१/१२/२०१६, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

२) शासन निर्णय क्रमांक एमईडी १०१५/प्र.क्र.३९६/१५/शिक्षण-२, दिनांक १६/१२/२०१५, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार -

१) शैक्षणिक वर्ष २०१७ -१८ पासून आरोग्य विज्ञानाच्या सर्व व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश हे NEET (National Eligibility-cum-Entrance Test) या अखिल भारतीय स्तरावरील सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०३ डिसेंबर, २०१५ अन्वये एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीयुएमएस, बीएचएमएस, बीपीटीएच, बीओटीएच, बीएसस्सी (नर्सिंग), बीएएसएलपी आणि बीपीॲन्डओ हे आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आले आहे.

३) वरीलप्रमाणे पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी किमान अर्हता/पात्रता ही राज्य शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या प्रवेश नियमांनुसार तथा संबंधित अभ्यासक्रमाशी संबंधित केंद्रिय परिषदेने विहित केल्यानुसार राहील.

४) आरोग्य विज्ञानाच्या सर्व शासकीय/महानगरपालिकेच्या महाविद्यालयातील व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया (शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय/दंत महाविद्यालयातील १५ टक्के अखिल भारतीय कोटा वगळून व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटा वगळून) NEET परीक्षेतील गुणवत्तेनुसार राबविण्याची जबाबदारी ही आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहील.

तरी, राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक, कनिष्ठ महाविद्यालये आणि राज्यातील सर्व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाची महाविद्यालये यांनी वरील शासन निर्णयाची योग्य ती नोंद घ्यावी.

**(चंद्रशेखर व.ओक)भाप्रसे**
**सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MAHARASHTRA STATE, MUMBAI

Head Office : 305, Government Polytechnic Building, Kherwadi, Ali Yawar Jung Marg, Bandra (E) Mumbai - 400 051.
Regional Office : CET Cell, (DMER) Opp. Govt. Dental College, St. Georges Hospital Campus, Fort, Mumbai 400 001.
: CET Cell, Directorate of Technical Education, 3, Mahapalika Marg, Mumbai 400 001.
E-mail - maharashtra.cetcell@gmail.com Website - www.mahacet.org

No.StateCETCell/NEETUG2017/Notice No.1/Entrance/Pattern/666/2016, Date : 06/12/2016

## NOTICE

### Admission to Health Science Under Graduate Degree Courses through NEET from Academic Year 2017-18

**Ref : 1) Government Resolution No. CET-3516/CR 441/16/Edu-2, dated 01/12/2016, Medical Education & Drugs Department, Mantralaya, Mumbai**

**2) Government Resolution No. MED-1015/CR 396/15/Edu-2, dated 16/12/2015, Medical Education & Drugs Department, Mantralaya, Mumbai**

As per the above referred Government Resolution –

1. Admission to Health Science Degree Courses from Academic Year 2017-18 will be done through NEET (National-Eligibility-cum-Entrance Test), test conducted at All India Level.
2. As per the Government Gazette dated 03rd December 2015, MBBS, BDS, BAMS, BUMS, BHMS, BPTh., BOTh., BSc (Nursing), BASLP and BP&O Courses are declared as Professional Health Science Courses.
3. The eligibility criteria for the above courses will be as per the concerned Central Councils or as per specified by the State Government from time to time.
4. The admission process for all Government/Corporation Colleges and Private Unaided Colleges in the above Professional Health Science Courses (Excluding 15% All India Quota in Government/Corporation Medical/Dental Colleges and Institutional Quota in Private Unaided Colleges) will be carried out by the Commissioner, State CET Cell, Government of Maharashtra, Mumbai.

This is for the information to all the students, parents, junior colleges and the institutions conducting Professional Health Science Courses in the State.

**(Chandrashekar V. Oak) IAS**
**Competent Authority and Commissioner**
**State Common Entrance Test Cell,**
**M.S., Mumbai**

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून आरोग्य विज्ञान व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश हे NEET(National Eligibility-cum-Entrance Test ) या सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे करण्याबाबत...**

**महराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,**
**लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.**
**शासन निर्णय क्रमांक:-सीईटी ३५१६/प्र.क्र.४४१/१६/शिक्षण-२.**
**दिनांक : ०१/१२/२०१६.**

**वाचा** : १)संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे पत्र क्र.संवैशिवसं/ वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश/१-अ/१६, दिनांक ०४/११/२०१६.
२)केंद्र शासनाचा अध्यादेश (No.४ of २०१६) दिनांक २४/०५/२०१६.
३)भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद यांचे पत्र क्र.१२-१८/२०१६-NEET, दिनांक ३१/०५/२०१६.
४)वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन अधिसूचना क्र.एमईडी १०१६/ प्र.क्र.६९ /१६/ शिक्षण, दिनांक १८/०८/२०१६ व दिनांक १९/०८/२०१६.
५) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन अधिसूचना क्रमांक एमईडी १०१५/ प्र.क्र.३४२/ १६/ शिक्षण-२,दिनांक १४/०६/२०१६
६) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन अधिसूचना क्र.एमआयएससी २०१५/ प्र.क्र.२५२/ तांशि-४,दिनांक ०३/१२/२०१५.

**प्रस्तावना** :- मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सन २०१६-१७ पासून एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. अभ्यासक्रमाचे प्रवेश हे नीट (NEET) परीक्षेद्वारे करणे आवश्यक आहे. तथापि, केंद्र शासनाच्या दिनांक २४/०५/२०१६ च्या अध्यादेशातील तरतूदीस अनुसरुन चालू वर्षी (२०१६-१७) महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय/ दंत महाविद्यालयांचे प्रवेश हे एमएचटी-सीईटी-२०१६ या परीक्षेतील गुणवत्तेनुसार करण्यात आले असून खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय/ दंत महाविद्यालयांतील प्रवेश हे नीट (NEET) परीक्षेच्या गुणवत्तेनुसार करण्यात आले आहेत. त्याप्रमाणेच आरोग्य विज्ञानाच्या इतर अभ्यासक्रमांचे, म्हणजेच आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी, फिजीओथेरपी, स्पीच अँण्ड लँग्वेज थेरपी व नर्सिंग या पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश हे सुध्दा एमएचटी-सीईटी-२०१६ या परीक्षेच्या गुणवत्तेनुसार करण्यात आले आहेत. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. या दोन्ही अभ्यासक्रमांचे राज्यातील सर्व महाविद्यालयांतील प्रवेश हे सन २०१७ पासून नीट (NEET) मार्फत करणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणेच आयुर्वेद व युनानी शाखेतील पदवी अभ्यासक्रमांचे (बी.ए.एम.एस./ बी.एच.एम.एस.) प्रवेश सुध्दा सन २०१७ पासून नीट (NEET) या परीक्षाद्वारेच करण्यात यावे, असे भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेच्या दिनांक ३१/०५/२०१६ च्या पत्रान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील आरोग्य विज्ञानाच्या विविध अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी राबवावयाच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned by CamScanner

**शासन निर्णय :-** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून आरोग्य विज्ञानाच्या सर्व व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश हे NEET (National Eligibility-cum-Entrance Test) या अखिल भारतीय स्तरावरील सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी किमान अर्हता/ पात्रता ही राज्य शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या प्रवेश नियमांनुसार तथा संबंधित अभ्यासक्रमाशी संबंधित केंद्रीय परिषदेने विहित केल्यानुसार राहिल.

३. आरोग्य विज्ञानाच्या सर्व व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश प्रक्रिया NEET परीक्षेतील गुणवत्तेनुसार राबविण्याची जबाबदारी ही आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा, महाराष्ट्र राज्य यांची राहिल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(स्वाक्षरी)
( [illegible] वि.अभिरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद,विधानभवन मुंबई.
मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा,विधानभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई.
मा. अपर मुख्यसचिव, वैद्यकीय शिक्षण वऔषधीद्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई.
मा. प्रधान सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई.
मा. प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई.
मा. प्रधान सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
मा. प्रधान सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
आयुक्त,राज्य सामाईक प्रवेशपरिक्षा कक्षमहाराष्ट्र राज्य,मुंबई.
कार्यासन सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/ शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण, २०५, [illegible] बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पु) मुंबई-५१.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.

Scanned by CamScanner

अधिष्ठाता/ प्राचार्य, राज्यातील सर्व शासकीय/ अनुदानित/ खासगी विनाअनुदनित वैद्यकीय/ दंत/आयुर्वेद /होमिओपॅथी/ युनानी/नर्सिंग/फिजीओथेरपी/ऑक्युपेशनल थेरपी महाविद्यालये.
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट अॅण्ड डेंटल, कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री. जी. हाऊस, ७५, मिटरोड, फोर्ट, मुंबई.
सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-२).

Scanned by CamScanner